अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब
शपथेवर सत्य निवेदन करतो की,
माझे नावः चंद्रहास विठ्ठलराव मेटे
वयः ५७ वर्ष, धंदाः मुख्याध्यापक, श्री. व्यंकटेश माध्यमिक विद्यालय, लातूर
राहणारः एल.आय.सी. कॉलनी, लातूर

**सरतपास सरकारपक्षातर्फे सौ. एम.एस. जोशी, सहाय्यक सरकारी अभियोक्ताः–**

प्रशांत पटने यांना मी ओळखतो, ते न्यायालयात हजर आहेत. मी २०२३ मध्ये श्री व्यंकटेश माध्यमिक विद्यालय, लातूर येथे प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होतो. प्रशांत पटने हे संस्थेचे सचिव नसताना दररोज विद्यालयात येऊन शालेय कामकाजात मला अडथळा आणत होते. ते मुख्याध्यापकाच्या कार्यालयात येऊन मोठमोठयाने बोलत असत. सुपारी खाऊन विद्यार्थ्यांसमोर थुकत असत. विद्यालयातील शिपायांना बोलावून शाळाबाहय कामे सांगत असत. विद्यालयातील शिक्षकांना बोलावून बाहेर घेऊन जात असत. केंव्हाही विद्यालयात येऊन माझ्या कक्षात विनापरवानगी येऊन मला दाबदडप करत असत. तुझ्यावर खोटया केसेस करुन तुला जेलमध्ये पाठवतो अशा धमक्या देत असत. ताबोडतोब राजीनामा देऊन टाक म्हणून दमदाटी करत असत.

२. दि.१६/१०/२०२३ रोजी प्रशांत पटने ने मा. अधिक्षक, माध्यमिक विभाग वेतन पथक, लातूर यांना पत्र देऊन माझा पगार स्थगित करावा असे सांगितले. प्रशांत पटने यांच्या सचिव नसताना सतत विद्यालयात येऊन गैरवर्तणुक केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होऊन त्यांची संख्या कमी झाली.

३. दि.१९/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास विद्यालयात येऊन मी माझे शासकीय काम करत असताना प्रशांत पटने यांनी मला उलटसुलट विचारणा केली. मी संस्थेचा सचिव आहे, मी सांगितलेली काम तुला करावीच लागतील अशा धमक्या दिल्या. तसेच माझी नोकरी घालवण्याची आणि मारहाण करण्याची धमकी दिली. सदरील व्यक्ती संस्थेचा सचिव नसून स्वत:ला सचिव समजून मला त्रास देत आहे. आरोपीच्या वर्तवणुकीमुळे माझ्या शासकीय कामात अडथळा निर्माण झाला. म्हणून मी दि.२०/१०/२०२३ रोजी गांधी चौक पोलीस स्टेशन येथे त्याचेविरुद्ध तक्रार दिली. आता मला दाखविलेली तक्रार तिच आहे, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे, ती **नि.क्र. २९** वर आहे. मी पोलीसांना तपासादरम्यान हजेरीपत्रक दिले होते. आज मी त्याची प्रमाणित प्रत दाखल करीत आहे. ते **नि.क्र. ३०** वर आहे.

**आरोपीतर्फे उलटतपास ॲडव्होकेट श्री. ऐ.एम. निंबुरगे**

४. मी १९९४-१९९५ पासून प्रशांत पटने यांना ओळखतो. त्यांची वडिलांनी मला संस्थेमध्ये नोकरी लावली होती म्हणून मी प्रशांत पटने यांना ओळखत होतो. प्रशांत पटनेचे वडिल संस्थेचे सचिव होते. त्यांचा मृत्यु किती वर्षापूर्वी झाला हे मला आठवत नाही. वडिलांच्या मृत्युनंतर प्रशांत पटने यांनी शाळेचे कामकाज पाहणे सुरु केले. वडिलांच्या मृत्युनंतर प्रशांत पटने हे संस्थेचे सचिव म्हणून कामकाज पाहत होते. मी २०२२ मध्ये प्रभारी मुख्याध्यापक झालो. दि.०१/०४/२०२४ रोजी प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कायम मान्यता मिळाली. माझ्या मुख्याध्यापक पदाचा प्रस्ताव गंगाधरअप्पा मंठाळे यांच्या सहीने गेला होता. गंगाधरअप्पा संस्थेचे सचिव आहेत. त्यांना धर्मादाय आयुक्ताकडून मान्यता मिळाली नाही. प्रभारी मुख्याध्यापक म्हणून मान्यता मिळाल्याचे पत्र मी पोलीसांना

तपासादरम्यान दिले होते. मला आता शिक्षणअधिकारी कार्यालय यांचे दि.०६/१२/२०२३, दि.१५/०६/२०२३ व दि.०२/०४/२०२४ चे पत्र दाखविले, त्यामध्ये गंगाधरअप्पा यांनी माझा प्रभारी मुख्याध्यापकाचा प्रस्ताव पाठवला असा उल्लेख नाही. बचाव पक्षाच्या वकिलांनी साक्षीदारांना पत्र दाखविल्याने त्या पत्रांना **नि.क्र. ३१, ३२, ३३** देण्यात येते.

५. तक्रार देण्यास एक दिवसाचा उशिर झाला कारण मी प्रशांत पटने यांना तसे न वागण्याची विनंती केली परंतु त्यांनी ऐकले नाही म्हणून मी तक्रार दिली. मला मुख्याध्यापक म्हणून रजा पाहिजे असेल तर तो अर्ज मी संस्थेच्या सचिवांना देतो. मी प्रत्यक्ष रजेचा अर्ज घेऊन जातो.

प्रश्न – तुम्ही तुमचा अर्ज प्रशांत पटनेकडे पाठवतात काय ?
उत्तर – मी प्रशांत पटने आणि गंगाधरअप्पा या दोघांकडेही अर्ज पाठवतो.

६. प्रशांत पटने यांनी दि.१६/१०/२०२३ रोजी माझा पगार बंद करावा म्हणून पत्र दिल्याने मी निराश झालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगतो की प्रशांत पटने हे शैक्षणिक कामकाजात अडथळा आणतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रशांत पटने संस्थेचे सचिव असल्याने शाळेत येतात. प्रशांत पटने कांही अडचणी असतील तर शैक्षणिक कामासंदर्भात माझ्याशी चर्चा करतात. टॅक्स भरला नाही म्हणून लातूर महानगरपालिकेने माझी कॅबीन सिल केली होती. त्यावेळी प्रशांत पटने यांनी महापालिकेकडे अर्ज देऊन टॅक्स भरण्यासाठी मुदत मागितली होती, त्यामुळे ते सिल निघाले. हे म्हणणे खरे नाही की, दि.१९/१०/२०२३ रोजी कोणतीच घटना घडली नाही. गंगाधरअप्पा मंठाळे संस्थेचे सदस्य

असल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, गंगाधर मंठाळे यांच्या चिथावणीवरुन खोटी तक्रार प्रशांत पटने यांचेविरुद्ध केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दि.१६/१०/२०२३ रोजी माझ्या दिलेल्या अर्जाचा राग मनात धरुन गंगाधर मंठाळे यांच्या सांगण्यावरुन खोटी तक्रार दिली.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIDYADHAR SHESHARAO MORE
Date: 2026.05.06 17:23:32 +0530

( विद्याधर शे. मोरे )

दिनांक :–०६/०५/२०२६

अतिरिक्त सत्र न्यायाधीश–१

लातूर